आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)

शनिवार दिनांक ०४ जुलै २०२६

ठळक बातम्या

1. संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून होणार सुरू.
2. ई-20 इंधनावरील वाहने पूर्ण चाचण्यांनंतरच बाजारात येणार; ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया चे स्पष्टीकरण.
3. राज्यात सहकारी संस्थाचे जाळं अधिक मजबूत करण्यासाठी वेगळा सहकार शिक्षण निधी उभा करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा.
4. पंढरपूरला विठ्ठुरायाच्या दर्शनासाठी यवतमाळहून निघाली राज्यातली पहिली दिव्यांगांची वारी .

संसदेचे पावसाळी अधिवेशन

संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होईल. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी समाज माध्यमावर दिलेल्या माहितीनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २० जुलै ते १३ ऑगस्ट या कालावधीत संसदेची दोन्ही सभागृहे बोलावण्यास मंजुरी दिली आहे. या सुमारे तीन आठवड्यांच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सरकार अनेक महत्त्वाची विधेयके मंजूर करण्याचा प्रयत्न करेल. दरम्यान विरोधी पक्ष काँग्रेसचे खासदार जयराम रमेश यांनी सांगितले की संसदेच्या आगामी मान्सून अधिवेशनात पक्ष परराष्ट्र धोरण, बिहारमधील विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर), निवडणूक आयोगाचे कार्य, परिसीमन, 'एक देश-एक निवडणूक' आणि अयोध्या राममंदिरातील कथित देणगी अनियमितता यांसह अनेक मुद्दे उपस्थित करणार आहे.

ई-20 इंधन

ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआरएआय), कोथरूड येथे आज आयोजित पत्रकार परिषदेत ई-20 इंधनाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. एआरएआयचे संचालक डॉ.रेजी माथाई यांनी सांगितले की, ई-20 इंधनावर चालणारी वाहने बाजारात आणण्यापूर्वी त्यांच्या इंजिन, इंधन प्रणाली आणि इतर महत्त्वाच्या घटकांची विविध परिस्थितींमध्ये कठोर चाचणी केली जाते. वाहनांची कामगिरी, सुरक्षितता आणि टिकाऊपणाची खात्री झाल्यानंतरच त्यांना विक्रीसाठी मंजुरी दिली जाते. ई-20 सुसंगत वाहनांची प्रयोगशाळेत तसेच प्रत्यक्ष रस्त्यावर सुमारे ४० ते ६० हजार किलोमीटरपर्यंत चाचणी केली जाते, असेही त्यांनी सांगितले. ई-20 इंधनाच्या वापरामुळे इंधन कार्यक्षमतेत केवळ २ ते ६ टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते, मात्र वाहन चालवण्याची पद्धत, रस्त्यांची स्थिती आणि नियमित देखभाल यांचाही इंधन वापरावर परिणाम होत असल्याचे एआरएआयने स्पष्ट केले. वाहनांची वेळेवर सर्व्हिसिंग करण्याचा सल्लाही यावेळी देण्यात आला.

## कांदा खरेदी

केंद्र सरकारने कांद्याचा खरेदी दर १३ टक्क्यांनी वाढवला आहे. हा दर १ हजार ८७५ रुपये प्रति क्विंटलवरून २ हजार १२५ रुपये प्रति क्विंटल केला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने ही माहिती दिली. सुधारित खरेदी दर आजपासून लागू झाला आहे. सरकारच्या किंमत स्थिरीकरण धोरणाअंतर्गत 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत कांद्याची खरेदी सध्या सुरू आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, कांद्याचं उत्पादन ३०७ लाख मेट्रिक टनांहून अधिक होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये सध्या पुरेसा साठा असून, कांद्याच्या तुटवड्याची कोणतीही चिन्हं सध्या दिसत नाहीत, असंही मंत्रालयाने सांगितलं.

## दहशतवादी घोषित

बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्यानुसार केंद्रीय गृहमंत्रालयानं २३ पाकिस्तानी नागरिकांना दहशतवादी म्हणून घोषित केलं आहे. हे लोक जैशे मोहम्मद, लष्कर ए तैय्यबा सारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित असून जम्मू काश्मीरमध्ये घुसखोरी, शस्त्रं पुरवणं आणि हल्ल्यांची योजना आखणं यामध्ये त्यांचा हात आहे. या घोषणेमुळे राष्ट्रीय तपास संस्थेसारख्या सुरक्षा संस्थांना या लोकांची मालमत्ता जप्त करता येईल आणि बँक खाती गोठवता येतील जेणेकरून त्यांच्याकडून होणारी शस्त्र खरेदी थांबता येईल.

## एकनाथ शिंदे रुग्णालयात

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना ठाण्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सततचा कामाचा ताण, धावपळ आणि अपुऱ्या विश्रांतीमुळे त्यांना ताप व अशक्तपणा जाणवू लागल्याने शुक्रवारी उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचे नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आले असून ठाण्यातील पक्षप्रवेश कार्यक्रमही पुढे ढकलण्यात आला आहे.

## जय गोमाता

महाराष्ट्र पशुसंवर्धन खाते आणि महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने आयोजित 'जय गोमाता–राज्यमाता गोमाता संवाद यात्रा' उद्या रविवार ५ जुलै रोजी नागपुरात समारोपाला येणार आहे. वसंतराव देशपांडे सभागृहात दुपारी 3 वाजता होणाऱ्या समारोप कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## पीक विमा

राज्यातील शेतकऱ्यांना २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. तेंव्हा ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. सुधारित योजनेनुसार अधिसूचित महसूल मंडळामध्ये अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाईचा लाभ मिळणार आहे. खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या एकूण १४ पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

## सहकारी संस्थाचे जाळे

नवीन कुशल कामगार घडवण्यासाठी तसंच राज्यामधली सहकारी संस्थाचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी एक सहकार शिक्षण निधी उभा करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. राज्य सरकारच्या सहकारी युनियन च्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रसरकारची सध्याची धोरणे ही देशाच्या जीडीपीमध्ये सहकारक्षेत्राचा वाटा तिपटीपर्यंत वाढवण्याच्या दिशेने आखलेली आहेत असं सांगत फडवणीस यांनी सहकार चळवळ पुढे जाण्यासाठी मनुष्यबळ आवश्यक असते, पर्यायाने त्यामध्ये गुंतवणूक करावी लागते असं स्पष्ट केलं. सहकारी क्षेत्राला बळकटी येण्यासाठी कुशल कामगार तयार होणे आवश्यक असते. यासाठी पूर्वी शिक्षण निधी असे. तो निधी पुन्हा सुरु करू असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## 'सहकार गौरव पुरस्कार'

आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त आयोजित 'सहकार गौरव पुरस्कार' सोहळयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचा बंद झालेला निधी पुन्हा सुरू करण्याबाबत महिनाभरात निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सहकार चळवळीला महाराष्ट्राची समृद्ध परंपरा लाभली असून राज्यात दोन लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, आमदार प्रवीण दरेकर, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## दिव्यांगांची वारी

पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनासाठी यवतमाळहून दिव्यांगांची वारी विठ्ठलाच्या दारी निघाली आहे. सेवा समर्पण प्रतिष्ठानचा हा उपक्रम असून वारीचे हे तिसरे वर्ष आहे. मोठ्या संख्येने दृष्टिहीन वारकरी आषाढिनिमित्त हरी नामाचा गजर करत पंढरपूर येथे चंद्रभागेच्या वाळवंटात दाखल होण्यासाठी निघाले. पूर्णत: दिव्यांगांची पंढरपूरात जाणारी ही महाराष्ट्रातील पहिलीच वारी आहे. माजी मंत्री मदन येरावार व नगराध्यक्ष प्रियदर्शनी

उईके यांनी संत सूरदास यांची प्रतिमा व पादूका असलेली पालखी घेऊन वारीला सुरुवात केली. पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या या वारीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. २२ दिवस ५२१ किमीचा हा पायदळ प्रवास करून दिव्यांग वारी पंढरपूर येथे पोहचणार आहे. मार्गात भजन, कीर्तन असे कार्यक्रमही हे बांधव घेणार आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

उद्धव ठाकरे यांचे रामरक्षा पठण आंदोलन हे केवळ राजकीय फायद्यासाठी असल्याची टीका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी, प्रभू श्रीरामांचे नाव घेऊन आता राजकीय लाभ मिळणार नाही, असे सांगितले. अयोध्येतील राम मंदिराच्या लोकार्पणावेळी उद्धव ठाकरे यांनी अयोध्येला जाणे टाळले होते, तसेच हनुमान चालीसा प्रकरणातील त्यांची भूमिका जनतेने पाहिल्याचा उल्लेखही त्यांनी केला. सध्या हिंदुत्ववादी मतदार पुन्हा आकर्षित करण्यासाठी हा प्रयत्न होत असला तरी तो यशस्वी होणार नसल्याचा दावा बावनकुळे यांनी केला.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार आज नागपूरसह अमरावती, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट तर उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये जोरदार पर्जन्यवृष्टीचा यलो अलर्ट जारी करण्यात आलाय. उद्या देखील याच जिल्ह्यांसह वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यात देखील जोरदार पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. येत्या आठ तारखेपर्यंत विदर्भात वादळी पर्जन्यमान राहणार आहे. तत्पूर्वी, भंडारा जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वैनगंगा नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली असून गोसीखुर्द धरणाचे ११ दरवाजे ०.५ मीटरने उघडण्यात आले आहेत. धरणातून सध्या २,५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून तो टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. नदीपात्र व परिसरातील नागरिकांनी सतर्क राहून नदीत आवागमन टाळावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे. गोंदिया जिल्ह्यात देखील पावसामुळे वैनगंगा नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली असून, धापेवाडा धरणातील पाणीसाठाही वाढला आहे. धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणाचे १३ दरवाजे २ मीटरने उघडण्यात आले असून सध्या सुमारे ३,१५७ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. पाण्याची आवक वाढल्यास टप्प्याटप्प्याने आणखी दरवाजे उघडण्यात येणार असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.दरम्यान, आगामी काही तासांमध्ये गोंदिया जिल्ह्यात मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने या ठिकाणी येलो अलर्ट जारी करण्यात आला असून भंडारा अकोला यवतमाळ वाशिम या जिल्ह्यांमध्ये मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या येलो अलर्ट जारी करण्यात आलाय.

*****